# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२४—२५)/०६/२०२४

## स्मरण परिपत्रक—१ :

**विषय:** शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करिता BBA, BMS & BCA या अभ्यासक्रमांच्या विद्यमान तसेच व प्रस्तावित नविन संस्थेच्या मान्यते प्रक्रिये बाबत....

**संदर्भ:**
१) विद्यापीठ परिपत्रक क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२३—२४)/४५/२०२४ दिनांक १५ फेंब्रुवारी, २०२४
२) संचालक, तंत्रशिक्षण, संचालनालय यांचे परिपत्रक क्र२/एनजीसी/ मान्यता/BBA, BMS & BCA /२०२४/२७, दिनांक १७ जानेवारी, २०२४
३) AICTE Public Notice for Approval Procress 2024-25
४) Prof. Manish R. Joshi, Secretary, University Grants Commission, Ministry of Educations, Government of India. Letter no. 2-79/2023 (CPP-II) dated 08th January, 2024.
५) कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचा इमेल दिनांक ३ फेब्रुवारी, २०२४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे खालील प्रमाणे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून BBA, BMS & BCA हा अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) यांच्या अधिपत्याखाली संलग्नित राहणार असून त्यासंदर्भात विद्यापीठाकडे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) साठी प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार सद्यस्थितीत ज्या महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये BMS हे अभ्यासक्रम सुरू आहेत त्यांनी Approval Process Handbook 2024-2025 नुसार कार्यवाही करावी.

तसेच तंत्रशिक्षण संचालनालय यांचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/मान्यता/ BBA, BMS & BCA /२०२४/२७, दिनांक १७ जानेवारी, २०२४ अन्वये बी.एम.एस. या अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्थांपैकी ज्या संस्था अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त करणार आहेत अशा संस्थांनी शिखर संस्था बदलाबाबत शासनाची मान्यताघेण्याकरिताचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ'

प्रमाणे संबंधित सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्याकडे सादर करावा. (सोबत प्रत जोडीत आहे.), सहसंचालक यांच्याकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर परवानगी प्रत घेऊन विद्यापीठाकडे परवानगीसाठी पत्र सादर करावे. स्वायत्त महाविद्यालयांनी देखिल सदर प्रक्रिया BBA, BMS & BCA हे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (AICTE) ची परवानगी घेऊन संचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडे प्रस्ताव सादर करावेत व त्याची एक प्रत विद्यापीठास पाठवावी. तद्नंतर सदर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४—२५ पासून सुरू करता येईल याची नोंद घ्यावी.

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

ठिकाण : मुंबई—४०० ०३२
दिनांक : २९ मे, २०२४

प्रति,
मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना .

महाराष्ट्र शासन


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२ ६८५९७४६५/४९२/४४२
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in


परिपत्रक :

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/BBA_BMS_BCA/२०२४/२८ दिनांक : 17 JAN 2024

प्रति,

प्राचार्य,

BBA_BMS_BCA अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यमान / प्रस्तावित नवीन संस्था,

महाराष्ट्र राज्य

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता BBA_BMS_BCA अभ्यासक्रमांच्या विद्यमान तसेच व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत.....

संदर्भ: १) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताच्या मान्यता प्रक्रिये संदर्भातील अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रके

२) शासन पत्र क्रमांक बैठक-२०२४/प्र.क्र.०२/विशि-३ दिनांक १२ जानेवारी २०२४

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी अधिसूचना / जाहीर सूचना / परिपत्रका द्वारे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीताच्या नवीन संस्था/अभ्यासक्रम इत्यादींच्या मान्यता प्रक्रियेसंदर्भातील अटी, शर्ती, मानके व मान्यता प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे व त्या संबंधीचे Approval Process Handbook प्रसिद्ध केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या संदर्भातील नवी दिल्ली येथे होणाऱ्या सेमिनार बाबत तसेच या विभागातील विविध विषयांबाबत दिनांक ०५ जानेवारी २०२४ रोजी मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त संदर्भीय पत्र क्रमांक २ अन्वये आवश्यक त्या कार्यवाहीस्तव प्राप्त झाले आहे.

सदर इतिवृत्तात नमूद केल्यानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने बी.बी.ए./बी.सी.ए./बी.एम.एस. या अभ्यासक्रमांची मान्यता प्रक्रिया त्यांच्या अखत्यारीत आणलेली असल्यामुळे सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबतची नियमावली तंत्रशिक्षण संचालनालयाने शासनाकडे मान्यतेकरिता तातडीने सादर करावी व तसे प्रवेश नियामक प्राधिकरणाला (CET) ला कळवावे. तसेच ज्या ज्या संस्था सदर अभ्यासक्रमास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त करतील अशा संस्थांच्या या अभ्यासक्रमांचे नियंत्रण तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत करावे असे स्पष्ट केले आहे.

उपरोक्त निर्देश विचारात घेऊन कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने बी.बी.ए./ बी.एम.एस. / बी.सी.ए. या अभ्यासक्रमांची मान्यता त्यांच्या अखत्यारीत आणलेली आहे. त्यानुसार

१) बी.बी.ए./ बी.एम.एस. /बी.सी.ए. या अभ्यासक्रमांच्या विद्यमान संस्थांपैकी ज्या संस्था अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त करणार आहेत अशा संस्थांनी शिखर संस्था बदलाबाबत शासनाची मान्यता घेण्याकरिताचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या प्रपत्र 'अ' प्रमाणे संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचेकडे सादर करावा.

२) बी.बी.ए./ बी.एम.एस. /बी.सी.ए. या अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था सुरू करण्यासाठी तसेच विद्यमान संस्थेमध्ये बी.बी.ए./ बी.एम.एस. /बी.सी.ए. अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शासनाची मान्यता/शासनाचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्याकरिताचा प्रस्ताव दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क भरुन ते नोंदणी शुल्क भरलेल्या पावतीसह तात्काळ शासनाची मान्यता घेण्याकरिताचे प्रस्ताव सोबत जोडलेल्या प्रपत्र 'ब' प्रमाणे संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचेकडे सादर करावा.

विभागीय सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांनी या संचालनालयाचे पत्र क्रमांक २/एनजीसी/नवीन संस्था_अभ्यासक्रम/२०२४/२२, दिनांक १५.१.२०२४ अन्वये कार्यवाही करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सदरील परिपूर्ण प्रस्ताव शासन मान्यतेस्तव संचालनालयास सादर करावेत.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत:१)सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर -त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील विद्यमान बी.बी.ए./ बी.एम.एस. /बी.सी.ए. संस्थाना तसेच प्रस्तावित नवीन संस्थांना आपले स्तारावरुन अग्रेषित करावे.

२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे, यांना माहितीसाठी

## विवरणपत्र -अ [Annexure -A]

### Statement showing information of the existing Institutions who apply to Grant BBA/BMS/BCA course from AICTE for A.Y.2024-25

| Sir no | Name of the Trust with Address & Phone Numbers | DTE Code | Name & Address of the Institute & Phone Numbers | Existing Programmes in the institute (Arts,Commerce, Science,BBA,BMS, BCA etc) | Existing Programme, Course & Intake for BBA/BMS/BCA applied under AICTE | | Affiliated University / Existing University for BBA/BCA/BMS courses |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Programme / Level | Intake | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 8 | 9 |
| | | | | | | | |